प्रकरण - चौथे

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे महाराष्ट्राबद्दलचे विचार

प्रकरण चौथे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महाराष्ट्राबद्दलचे विचार

प्रस्तावना:

१९५६ साली भाषावार पुनर्रचना कायदा अमलात आला. तत्पुर्वी स्वातंत्र्यापासूनच भाषावार प्रांतरचनेची मागणी वाढली होती. त्यामुळे केंद्र शासनाने भाषावार प्रांतरचना करण्यासाठी दार आयोग, ज.व.प. समिती, फाजल अली आयोग इत्यादी समित्या स्थापन केल्या होत्या. समित्यांनी निवेदने मागविली, काही व्यक्तीच्या मुलाखती घेतल्या. त्यात संपूर्ण भारतातील नेते, संस्था, संघटना, राजकीय पक्ष इत्यादींनी आपली निवेदने समित्याना सादर केली. या समित्यांनी ज्या शिफारशी केल्या, त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्राला विरोध दर्शवून मुंवई हे स्वतंत्र राज्य आणि उर्वरित महाराष्ट्र दुसरे राज्य करावे अशी शिफारस केली. शिवाय मुंवई हे द्विभाषिक राज्य कायम ठेवावे अशीही शिफारस केली. त्यानुसार मराठी व गुजराती भाषिकांचे मुंवई राज्य १९५६ च्या कायद्याने अस्तित्वात आले. परंतु महाराष्ट्रातील जनतेने मुंवईसह मराठी भाषिकांच्या संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ केली. त्याचा परिणाम म्हणून १९६० साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४८ पासून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीवद्दल जे विचार मांडले आहेत, त्यामध्ये मुंबई हा महाराष्ट्राचा भाग आहे या गोष्टीवर डॉ. आंबेडकरांनी कायमपणे ठाम भूमिका मांडली असली, तरी त्यांनी महाराष्ट्राबद्दल मात्र वेगवेगळी भूमिका घेतली आहे. त्यांनी प्रथम महाराष्ट्राचे चार भाग करण्यास सांगितले. कालांतराने म्हणजे १९५६ साली मराठी भाषिक प्रदेशाचे दोन भाग करावे अशी सूचना केली. शेवटी मात्र मुंबईसह एक प्रांत व्हावा असे मत त्यांनी मांडले. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्राबद्दल सविस्तररीत्या चर्चा केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये दोन भाग असून पहिल्या भागामध्ये मुंबई शहरावद्दल डॉ. बावासाहेब आंवेडकरांनी मांडलेल्या विचारांचा परामर्श घेतला आहे, तर दुस-या भागामध्ये डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी महाराष्ट्रावद्दल घेतलेली भूमिका स्पष्ट केले आहे.

अ) मुंबई शहर

राज्य पुर्नरचनेमध्ये मुंवई शहर ही एक समस्या होऊन वसली होती. या शहराच्या वावतीत सारखे वाद चालू होते व ते राजकीयदृष्टया विकोपास गेलेले होते. महाराष्ट्रीय जनतेला मुंवई शहराचा समावेश महाराष्ट्रात करण्यात यावा, असे वाटत होते. तर गुजराथ्यांना ते स्वतंत्र राज्य म्हणून पाहिजे होते. त्यामुळे विचारात भिन्नता निर्माण होऊन वादातून वितंडवाद निर्माण झाले. परंतु तोडगा निघू शकला नाही.

मुंवई हे आपले शहर आहे, असा गुजराथी लोक कधीच दावा करीत नव्हते. परंतु शहरावरील पकडही ते ढिली करावयास तयार नव्हते. मुंवई महाराष्ट्रात अंतर्भूत व्हावी अशी महाराष्ट्रीयांची मागणी होती आणि गुजराथी भाषिकांचा या गोष्टीला तेवढयाच मोठया प्रमाणात विरोध होता. त्याकरीता त्यानी दोन पर्याय सुचविले. पहिला म्हणजे द्विभाषिक मुंवई राज्य आणि कॉंग्रेस कार्यकारिणीने ठरविल्याप्रमाणे मुंवई शहराचे स्वतंत्र राज्य वनविणे हा दुसरा पर्याय होता. या दुस-या पर्यायामुळे गुजराथ्यांना आनंद झाला होता. परंतु महाराष्ट्रीयाच्या मने असे उद्वीग्न झाली होती. त्यामुळे मुंवई शहराला महाराष्ट्रात समावेश करावे की करू नये हा वाद निर्माण झाला. डॉ. आंवेडकरांनी या मुद्दयाची सविस्तरपणे व चिकित्सकपणे मांडणी केली आहे. २६ ऑगस्ट १९४८ रोजी मुंवई महाराष्ट्रात असावा की नसावा यासाठी मुंवईतील इंडियन मर्चन्ट चेंवरच्या इमारतीत पुरूषोत्तम ठाकूरदास यांच्या अध्यक्षतेखाली गुजराती भाषिक व्यापारी व उद्योजकांची वैठक झाली. त्या वैठकीस एकूण ६० पेक्षा अधिक मान्यवर उपस्थित होते. या वैठकीत मुंवई च्या संदर्भात चर्चा झाली. त्यामध्ये भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न लांवणीवर टाकावा, जर हा प्रश्न लांवणीवर टाकण्यात आला नाही तर मुंवई शहराचा स्वतंत्र प्रांत करण्यात यावा. असा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावाबाबत डॉ. बाबासाहेब आंवेडकर असे म्हणतात की, "मुंवईचा महाराष्ट्रात समावेश करायचा की नाही हा प्रश्न सुटेपर्यंत भाषिक प्रांत निर्मितीचा प्रश्न लांवणीवर टाकावा या ठरावाबद्दल माझी काही तक्रार नाही हा प्रश्न मिटला तर फारच चांगले मग त्यासाठी ५ किंवा १० वर्षे लागली तरी हरकत नाही. परंतु हा ठराव म्हणजे केवळ पलायनवाद आहे, पळवाट आहे त्यामुळे हा प्रश्न सुटणार नाही. हा वाद फक्त स्थगित होईल हे लक्षात घेऊन मुख्य प्रश्न आताच सोडविणे अत्यंत आवश्यक आहे."[१] असे सांगितले.

इंडियन चेंवरच्या वैठकीतील व्यापारी उद्योजक आणि प्रा. वकील, प्रा. घीवाला व प्रा. दंन्तवाला इ. नी महाराष्ट्रामध्ये मुंवईचा समावेश विविध कारणामुळे होऊ नये यासाठी जे युक्तीवाद केले ते

कशापध्दतीने चुकीचे आहेत ते दाखवण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी प्रत्येक गोष्टीचा उदाहरणे देऊन खंडन केले आहे ते पुढीलप्रमाणे:

अ) मुंबई महाराष्ट्राचा अविभाज्य भाग

मुंबई महाराष्ट्राचा कधीही एक भाग नव्हता या मुदयाचे खंडन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ऐतिहासिक तसेच भौगोलिकदृष्टया विचार केला आहे. ज्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी प्राचीन इतिहास उपयोगाचा नाही असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. ऐतिहासिक काळातील लोकामधील बहुतांश संबंध हे फक्त जेता व जिंकलेले याच्यातच होते. त्यामुळे एखाद्या संस्कृतीचे वर्चस्व असेल तर ती आपोआपच दुस-या संस्कृतीवर कुरघोडी करत असे त्यामुळे डॉ. आंबेडकर म्हणतात, "मुसलमानानी हिंदूंवर विजय मिळवला परंतु मुसलमान हे मुसलमान राहिले व हिंदू हे हिंदूच राहिले. गुजराथीवर महाराष्ट्रीयांनी विजय मिळवला व काही वर्षे राज्य केले पण त्याचा गुजराथीवर काय परिणाम झाला? काही नाही. गुजराथी हे गुजराथीच राहिले तर महाराष्ट्रीयन हे महाराष्ट्रीयनच राहिले"[२]. यावरून कोणाचे ही वर्चस्व निर्माण झाले तरी त्याच्या संस्कृतीत फरक मात्र होत नाही. त्यामुळे या प्रश्नावर निर्णय घेताना भारतीय इतिहासाचा उपयोग होणार नाही, असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले.

भौगोलिकदृष्टया विचार करताना महाराष्ट्राच्या संदर्भात मुंबईच्या भौगोलिक रचनांचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांनी असे म्हटले की, "महाराष्ट्र प्रांताची नर्मिती झाल्यानंतर त्याचा आकार त्रिकोणी होईल. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर मुंबई शहर हे दमण व कारवार याच्यामध्ये आहे. गुजरातचा प्रांत दमण पासून सुरू होतो व उत्तरेकडे पसरतो. कन्नड प्रांत कारवार पासून सुरू होतो आणि दक्षिणेकडे पसरतो. गुजरातची जिथून हद्द सुरू होते त्या दक्षिण दमणपासून सुमारे ८५ मैल व जिथून कर्नाटक प्रांताची हद्द सुरू होते त्या उत्तर कारवारपासून २५० मैल अंतरावर मुंबई आहे. जर दमण व कारवार दरम्यानचा अखंड प्रदेश भौगोलिकदृष्टया महाराष्ट्राचा भाग असेल तर मुंबई महाराष्ट्राचा भाग नाही असे कसे म्हणता येईल. त्यामुळे भूगोलानेच मुंबईला महाराष्ट्राचा भाग बनविलेले आहे. म्हणून ज्यांना या नैसर्गिक वस्तुस्थितीला आव्हान द्यायचे असेल त्यांनी खुशाल द्यावे. कोणताही पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन ठेवला नाही तर मुंबई ही महाराष्ट्राचीच आहे. हा निष्कर्ष मान्य करावा लागेल"[३]. असा निष्कर्ष डॉ. आंबेडकरांनी मांडला आहे. अशारीतीने ऐतिहासिक व भौगोलिकदृष्टया मुंबई हे महाराष्ट्राचे भाग आहे.

ब) मुंबई आणि मराठा साम्राज्य

महाराष्ट्रात मराठयांचे साम्राज्य होते तरी मुंवई साम्राज्याचा एक भाग वनविण्याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. त्यामुळे डॉ. वावासाहेव आंवेडकर म्हणतात की, "मराठयांनी मुंवई कावीज करण्याची पर्वा केली नाही, याचा अर्थ मुंवई महाराष्ट्राचा एक भाग नाही ही गोष्ट सिध्द् होत नाही. त्याचा अर्थ इतकाच होतो की, मराठयांची सत्ता ही केवळ भूसत्ता होती. त्यामुळे त्यांनी सागरी वंदरावर विजय संपादण्यासाठी आपली शक्ती खर्च केली नाही. "[४] अशारीतीने डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी मुंवई हा महाराष्ट्राचा भाग आहे हे स्पष्ट केले आहेत.

क) मराठी भाषिकांची लोकसंख्या

ज्यावेळी मुंवई महाराष्ट्राला द्यायचे की नाही असा वाद निर्माण झाला त्यावेळी गुजराथी लोकांनी असे म्हटले की मुंवईमध्ये मराठी भाषिकांची संख्या कमी असल्यामुळे मुंवई हे महाराष्ट्राला देऊ नये. तेव्हा या विधानाचे खंडन करताना डॉ. वावासाहेव आंवेडकर असे म्हणतात की, "प्रा. गाडगीळ यांच्या मते, १९४१ च्या खानेसुमारीनुसार मुंवईत मराठी भाषा वोलणा-याची संख्या ५१% आहे. प्रा. घीवाला यांच्या मते ४१% आहे आणि प्रा. वकील यांच्या मते ३९% आहे. जर वकील यांची आकडेवारीची कारणमीमांसा पाहिली तर त्याचा निष्कर्ष तर्काधिष्ठीत आहे असे आढळते. कारण जेव्हापासून व्रिटीशांच्या हातात भारताची सूत्रे गेली, तेव्हापासून भारत हा एक देश झाला. देशातील कोणत्याही ठिकाणी जाण्यास सर्वांना परवानगी मिळाली. त्यामुळे देशाच्या सर्व भागातील लोकांना मुंबईत येण्याची अनुमती मिळाली. या कारणामुळे मुंबईत मराठी लोकांची संख्या कमी झाली. त्यात महाराष्ट्रीयांचा कोणताही दोष नाही. मराठी भाषिकांची संख्या मुंवईत कमी आहे हा महाराष्ट्रातून मुंवई वगळण्याच्या कृतीचा मुलभूत पाया होत नाही"[५] असे मत डॉ. आंवेडकरांनी मांडले आहे.

पुढे डॉ. वावासाहेव आंवेडकर म्हणतात, "ही गोष्ट निर्विवाद आहे की, मराठी भाषिकांची संख्या ५० टक्क्याहून कमी आहे. परंतु याच वेळेस दोन महत्त्वाच्या वावींचाही विचार करावयास पाहिजे. त्यापैकी एक बाब म्हणजे भौगोलिक दृष्टया मुंबई शहर हा महाराष्ट्राचा भाग आहे, हे कोणीही नाकबूल करणार नाही. प्रत्यक्ष मोरारजी देसाई यांनीच गुजराथ प्रदेश कॉंग्रेस कार्यकारीणीच्या आपल्या एका भाषणात ही कवुली दिली आहे."[६] असे सांगून डॉ. वावासाहेव आंवेडकर असे म्हटले की, "भारताच्या कानाकोप-यातून

मुंवईत थवेच्या थवे आलेले आहेत. त्याचा ही परामर्श घेणे आवश्यक आहे. यातील कोणी पोटाची खळगी भरण्यासाठी आले आहे तर कोणी व्यापार उदीम करण्यासाठी आले. अशा लोकांना मुंवईत समाविष्ट करणे घातकच. कारम या लोकाना मुंवई हे आपले घर वाटत नाही. ते मुंवईचे नागरिकही नाहीत. स्थलांतरीतासारखे धंदापाणी करतात. त्यासाठी काही दिवस येथे राहतात व शेवटी आपापल्या गावी निघून जातात"[७]. यावरून मुंवई हे भौगोलिक दृष्टया महाराष्ट्राचा भाग आहे आणि स्थलांतरीत झालेले लोक हे मुंवईचे नागरीक नाहीत असे मत डॉ. आंवेडकरानी मांडलेले दिसते.

डॉ. वावासाहेव आंवेडकरांच्या मते, "मुंवई हे फक्त महाराष्ट्रीयाचे घर असून हे इतर कोणाचेही होऊ शकत नाही. जे महाराष्ट्रीय नाहीत त्याचा लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करणे गैर होईल. महाराष्ट्रीय वहुसंख्यांक आहेत असा विचार अन्यायकारक होईल. त्याचवरोवर मुंवई शहरामध्ये नागरिकत्वासंवधी निर्भंद घालणारा असा कोणताही स्थानिक कायदा नव्हता. त्यामुळे परप्रांतातून येणा-या लोकांची मुंवई शहरात संख्या वाढली. या गोष्टीचा कोणीही विचार केलेला दिसून येत नाही. मुंवई राज्यात अशा प्रकारचा निवंर्धक कायदा असता तर भारताच्या इतर भागातून येथे लोक आले नसते. साहजिकच मुंवई शहरात महाराष्ट्रीयन वहुसंख्यांक राहिले असते."[८] दुसरी गोष्ट त्यानी विचारात घेतली नाही. ती ही की, "मुंवई हे पश्चिम किना-यावरील अत्यंत महत्त्वाचे वंदर आहे. त्यामुळेच महाराष्ट्रीयेत्तर मुंबई शहरात पेव फुटल्यासारखे आले. शिवाय मुंवई, मद्रास किंवा कलकत्त्यापेक्षा युरोपला नजिक आहे. मुंबईत नोक-या मिळणेही शक्य आहे की ज्या अन्यत्र मिळणे अवघड आहे आणि याच कारणामुळे हिंदुस्थानात कोणत्याही भागात राहणारी गरीब जनता आपले घर सोडून अल्पकालीन वास्तव्याकरिता मुंबईस येते."[९]

वास्तविकरीत्या या गोष्टीचा विचार अन्य दृष्टीकोनातून व्हावयास हवा. गेल्या दोन शतकापासून मुंबई शहरात वाहेरून लोक रहावयास येत आहेत. तरी देखील महाराष्ट्रीयाची लोकसंख्या ४८ टक्क्याहून घसरू शकली नाही. कारण या शहरात येणा-याची व जाणा-याची गोळावेरीज सारखीच होती. अशाप्रकारे स्थलांतर करणा-या लोकांमुळे मुंवई शहरालाही स्थलांतरीत स्वरूप प्राप्त झालेले आहे.

ड) गुजराथी भाषिक लोक मुंबईचे मूळ रहिवाशी आहेत

गुजरातींची संख्या मुंवईमध्ये जास्त होती, त्यामुळे गुजराती भाषिक लोक मुंवईचे आम्ही मुळ रहिवासी आहोत असे म्हणत होते. त्यावद्दल डॉ. आंवेडकरांनी असे म्हटले की, "गुजराथी हे स्वेच्छेने मुंवईला आले

नव्हते तर व्यापारी, आडते किंवा दलाल म्हणून काम करण्यासाठी त्यांना ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिका-यांनी त्यांच्या व्यापारासाठी सुरत येथील कारखान्यातून सुरती वनियाना आणले. या घटनेवरून गुजराथी मुंवई त कसे आले हे अधिक स्पष्ट होते."[१०] असे सांगून ते पुढे म्हणतात, "अन्य व्यापा-यांशी मुक्तपणे समान स्पर्धा करण्यासाठी व्यापाराच्या उद्देशाने गुजराथी मुंवईत आलेले नव्हते तर ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना व्यापार करण्याचा हक्क दिल्याने ते मुंवईत आले."[११] १६७१ मध्ये सर्वप्रथम गव्हर्नर आंगियर यांनी त्यांना मुंवईत आणण्याचा विचार केला आणि मुंवईच्या फायद्यासाठी सुरत येथील वनियांचे मुंवईत पुर्नवसन करण्याची एक योजना निर्माण केली. त्या योजनेनुसार सुरतमधील व्यापा-यांना मुंवईत आणण्याचे ठरविले. परंतु दिवू शहरातील निमा पारख याने एक याचिका मुंवई गव्हर्नरकडे दाखल केली. त्यामध्ये सुरतमधील वनियांना मुंवईत आल्यानंतर गोदामे उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे, मुक्तपणे धार्मिक विधी करण्यास परवानगी द्यावी, वंदरावर व्यापार करण्यास परवानगी असावी, कोणतेही कर लादू नये, कुंटुवियांना व आपल्या गोदामांना संरक्षण द्यावे इ. गोष्टींची तरतूद केली होती. ही याचिका ३ एप्रिल १६७७ रोजी मुंवईच्या डेप्युटी गव्हर्नरनी निकालात काढली आणि निमा पारखने सांगितलेल्या सर्व अटीच्यां पुर्तता करण्यास व त्यांना संरक्षण देण्यास ईस्ट इंडिया कंपनी समर्थ आहे असे स्पष्टपणे सांगितले.

या सर्व गोष्टीवरून गुजराथ्यांना मुंवईत आणण्याचे कार्य ईस्ट इंडिया कंपनीने केले आहे. ते पुराव्यानिशी डॉ. बावासाहेब आंबेडकरानी स्पष्टपणे दाखवून दिले आहे. गुजराथी लोक हे मुंवईचे रहिवाशी नाहीत हेही स्पष्ट केले आहे. असे असले तरी मुंवई शहरामध्ये गुजराती, मराठी व इतर भाषिक अल्पसंख्याक लोक राहतात त्यासाठी गुजराती लोकांनी मुंवई शहराच्या विकासातील दिलेले योगदान महत्वाचे आहे. त्याच्यावद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात, "मुंवई महाराष्ट्रात असावे ही महाराष्ट्रीयांची मागणी रास्त आणि योग्य असली तरी गुजराती लोकांकडे ज्या चांगल्या गोष्टी कडे दुर्लक्ष करून चालणार नाही कारण मुंवई शहरातील व्यापाराला व उद्योगधंद्याला लागणारा पैसा महाराष्ट्र पुरवू शकत नाही त्यामुळे तथील उद्योगधंदे व भांडवल नाहीसे केले तर त्याचा शहराच्या जीवनमानावर परीणाम होईल. त्यामुळे महाराष्ट्रीयानी हेही विसरावयास नको की, त्यांचा मूळ धंदा कारकूनाचा व हमालाचा आहे हे विसरू नये महाराष्ट्रीयानी या दृष्टीकोनातून मुंवई सुस्थितीत राहण्यासाठी मुंवईच्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे."[१२] असे मत डॉ. आंबेडकरानी मांडले आहे.

इ) मुंबई भारताची व्यापारपेठ परंतु महाराष्ट्राचे बंदर

मुंवई भारताची व्यापारपेठ आहे. या मुद्दाचे खंडन करताना डॉ. आंवेडकर असे म्हणतात की, "मुंवई ही संपूर्ण भारताची व्यापारपेठ आहे, हे मान्य आहे. परंतु त्यामुळे महाराष्ट्र मुंवईवर हक्क सांगू शकत नाही. असे म्हणता येणार नाही. कारण प्रत्येक देशातील वंदर हा त्या देशाचा एक प्रादेशिक भाग नाही असे होऊ शकत नाही. यासाठी डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी स्वित्झर्लंडचे उदाहरण दिले आहेत. स्वित्झर्लंडला वंदर नाही. ते इटली, जर्मनी किंवा फ्रान्सच्या वंदराचा वापर करते. मग त्या वंदरावर इटली, जर्मनी किंवा फ्रान्सचा हक्क स्वित्झर्लंड नाकारू शकत नाही. असे असताना मुंवई वंदर अन्य प्रांताची ही सेवा करते त्याना उपयोगी पडते म्हणून महाराष्ट्राचा मुंवईवरील हक्क कमा नाकारता येईल? जर विगर महाराष्ट्रीयनासाठी हे वंदर वंद करण्याचा हक्क महाराष्ट्रास मिळाला तर ती गोष्ट वेगळी आहे. घटनेनुसार तसा महाराष्ट्राला हक्क देण्यात आलेला नाही. त्याचवरोवर मुंवईचा महाराष्ट्रात समावेश करण्याने पूर्वीप्रमाणे वंदराचा वापर करण्याच्या विगर महाराष्ट्रीयनाच्या हक्कावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही."[१३] अशारीतीने मुंवई भारताची व्यापारपेठ असेल परंतु ते महाराष्ट्राचे एक वंदर आहे. व्यापारासाठी त्याचा वापर जर गुजराथी लोकांनी केला तरी ते मुंवई वंदर महाराष्ट्राचाच आहे. ते वेगळे करता येत नाही. असे मत डॉ. आंवेडकरानी मांडले आहे.

ई) गुजराथी भाषिक लोक मुंबईच्या व्यापार व उद्योगाचे मालक ईस्ट इंडिया कंपनीमुळेच

गुजराती लोकांची मुंवईतील व्यापारात मक्तेदारी निर्माण झाली असली तरी ती ईस्ट इंडिया कंपनीनी दिलेल्या मुंवईतील हक्कामुळे झाली आहे. परंतु मुंवईमधील व्यापार व उद्योगांची गुजरातींनी उभारणी केली नसून ती युरोपीयनांनी केली आहे. ती जर गुजरातींनी केली आहे असे कोणाला वाटत असेल तर त्यानी तसा दावा करण्यापूर्वी Times of India Directory पहावी अशी सूचना डॉ. आंवेडकरानी केली आहे. त्यामुळे गुजराथी हे केवळ व्यापारी होते, उद्योजक नव्हते, हे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई ही महाराष्ट्राची आहे, हे सिध्द झाल्यानंतर मुंबईचा व्यापार व उद्योगावर गुजराथीची मालकी आहे असा युक्तीवाद करून महाराष्ट्रात मुंबई समाविष्ट करण्याचा मुद्दा मांडणे योग्य नाही. असे

डॉ. वावासाहेव आंवेडकर म्हणतात यासाठी डॉ. वावासाहेव आंवेडकरानी उदाहरण देतात, "एका व्यक्तीने जमीन गहान ठेवली व ज्याच्याकडे ठेवली त्याने त्यावर कायमस्वरूपी वांधकाम केले म्हणून त्या व्यक्तीचा त्या जमिनीवरील हक्क संपुष्टात येत नाही. अशा प्रकारे गुजराथी म्हणतात की त्यांनी मुंवईत व्यापार उद्योगाची उभारणी केली. ही स्थिती एखादी वस्तू गहाण म्हणून घेणा-यापेक्षा वेगळी नाही."[१४] असे सांगून डॉ. आंवेडकर पुढे म्हणतात, "मुंवईचा महाराष्ट्रात समावेश करावा की करू नये या प्रश्नाची सांगड मुंवईत व्यापार उद्योगाची कोणी उभारणी केली याच्याशी घालणे योग्य नाही. कारण मुंवई शहरातील समाज मालक व कामगार आणि भांडवलदार व श्रमिक यामध्ये विभागला गेला असला तरी हीच स्थिती गुजराथमधील समाजामध्ये आणि भारतातील प्रत्येक प्रांतात कमी जास्त प्रमाणात आढळते. मग महाराष्ट्रीयन हे श्रमिक असल्याने महाराष्ट्रातून मुंवई वगळल्याने जर मुंवईतील भांडवलदार व मालकाचे रक्षण होणार नाही."[१५]

त्याचवरोवर मुंवईचा महाराष्ट्रात समावेश केला तर महाराष्ट्रीयन हे वहुसंख्यांक असल्याने ते मुंवईतील गुजराथी भांडवलदाराना सापत्नभावाची वागणूक देतील, त्यामुळे मुंवई स्वतंत्र असावी असा युक्तीवाद केला गेला. त्यावद्दल डॉ. आंवेडकरांनी असे म्हटले की, "केवळ महाराष्ट्र हा एकच प्रांत नाही की, जेथे अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अशी स्थिती कोणत्याही प्रांतात निर्माण होऊ शकते. त्यामुळे त्याचा प्रतिवंध करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत काही उपाययोजना केलेल्या आहेत. तसेच घटनेने काही मुलभूत हक्क दिलेले आहेत. संभाव्य सापत्नभावाच्या वागणुकीपासुन मुंवईतील गुजराथी व्यापारी व उद्योजकाना यापेक्षा अधिक कोणत्या प्रकारचे संरक्षण हवे आहे? असा ही प्रश्न उपस्थित केला."[१६]

डॉ. वावासाहेव आंवेडकर असे म्हणतात की, "महाराष्ट्रीयेतरांच्या भांडवलावर मुंवई शहर वसलेले आहे. हे सत्यही असेल. परंतु मद्रासी भांडवलावर मद्रास किंवा निव्वळ वंगाली भांडवलावर कलकत्त्याची तरी कुठे निर्मिती झाली आहे? या शहरासाठी युरोपियनांचे भांडवल गुंतले नसते तर दोन्ही शहरे ओसाड खेडीच राहिली असती. पण महाराष्ट्रीय मुंवईवर जेव्हा आपला हक्क दाखवितात तेव्हा त्याच्या विरूध्द हा वाद निर्माण का करतात? नाहीपेक्षा महाराष्ट्रीयांनी मुंवई शहराकरिता आपले श्रम दिले. नाहीतर वैभवशाली मुंवई नगरी आपल्या दृष्टीस पडली नसती. मुंवईला जीवदान देण्याचे कार्य महाराष्ट्रीयानीच केले हे विसरता कामा नये. अख्ख्या मुंवईस लागणारी वीज निर्मिती महाराष्ट्रातून होते. मुंवईचा पाणीपुरवठा महाराष्ट्रातून होतो. शहरातील श्रमाचा वाटा महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्राने ठरविले तर कोणत्याही क्षणी मुंवई शहराचे

मोहेंजोदडो 'एक मरत नगरी' होण्यास क्षणाचाही विलंब लागणार नाही."[१७] असे मत डॉ. आंबेडकरानी मांडले आहे.

यावरून स्पष्ट होते की, गुजराथी जरी व्यापारी आणि उद्योजक असतील आणि महाराष्ट्रीयन कामगार असतील तरी मुंबई प्रांत वेगळा करता येणार नाही. असे मत डॉ. आंबेडकरानी मांडले आहे.

ए) मुंबईच्या जादा उत्पन्नावर महाराष्ट्रीयांचा डोळा हा आक्षेप म्हणजे वस्तूस्थितीचा विपर्यास

मुंबईच्या जादा उत्पन्नावर महाराष्ट्रीयाचा डोळा हे विधान कसे चुकीचे आहे हे पटवून देताना डॉ. आंबेडकरानी असे स्पष्ट सांगितले की, "चुकीच्या आकडेवारीमुळे, अकौंटिंग पध्दतीमुळे ओव्हरहेड चार्जवर होणारा खर्च विचारातच घेतला गेला नाही. कारण त्यामध्ये १) गव्हर्नर व त्याचे व्यवस्थापन २) मंत्री व त्याचे प्रशासन ३) आमदार व त्यांचा खर्च ४) न्यायालयीन यंत्रणा ५) पोलीस व ६) पोलिस आयुक्त व तत्सम अधिका-यासाठी होणारा प्रांतिक प्रशासकीय खर्च इत्यादीवर होणारा खर्च वजा केलेले नाही त्यामुळे उत्पन्न जास्त दिसून येते परंतु प्रत्यक्षात हा खर्च वधितला तर मुंबईचे उत्पन्न कमी आहे"[१८] असे दिसून येईल असे मत डॉ. आंबेडकरानी मांडले. त्याचवरोवर मुंबईच्या जादा महसूलावर महाराष्ट्रीयाना जगायचे असल्याने त्यांना मुंबई हवी आहे असे विधान करण्यात येते. या विधानावर भाष्य करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी असे स्पष्टपणे म्हटले आहे की, "महाराष्ट्रीयांना पैशाचा वेध नाही, हा त्याचा मोठा सद्गुण आहे, त्यांना पैसा कधीही परमेश्वर वाटला नाही, तो त्याच्या संस्कृतीचा भाग आहे. म्हणून ते महाराष्ट्राबाहेरील अन्य समाजाला महाराष्ट्रात येऊ देतात. महाराष्ट्रात व्यापार उद्योगात मक्तेदारी निर्माण करू देतात. त्यामुळे ते मुंबईच्या उत्पन्नावर डोळा ठेवला नाही हेच सत्य आहे. परंतु समजा तसा हेतू महाराष्ट्रीयन लोकांच्या मनात असेल तर त्यात काय चूक आहे? मुंबईच्या जादा महसूलावर महाराष्ट्रीयांचा सर्वाधिक हक्क आहे, ही गोष्ट सुर्य प्रकाशाइतकी स्वच्छ आहे. भांडवलदाराप्रमाणेच कामगारांचा ही संपत्तीवर तितकाच हक्क असतो. ही वस्तुस्थिती नाकारणे कोणत्याही अर्थतज्ञास कठीण आहे."[१९]

यावरून मुंबईच्या उत्पन्नावर महाराष्ट्रीयाचा डोळा नसून तो त्याचा हक्क आहे. अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती हे दिसून येते. पुढे ते असे म्हणतात की, "मुंबईचे जादा उत्पन्न एकटया महाराष्ट्रालाच मिळत नाही तर ते संपूर्ण देशाला मिळते. आयकर, सुपर टॅक्स सारख्या कराद्वारे मुंबई केंद्र सरकारच्या खजिन्यात भर घालते व त्याचा वापर केंद्र सरकार अन्य प्रांतासाठी करीत असते. तर मुंबई हा

स्वतंत्र प्रांत झाला तरी ते आयकर, सुपर टॅक्सच्या द्वारे केंद्र सरकारला देत राहिल, म्हणूनच तर मुंबई हे फक्त महाराष्ट्राला मिळू नये, हा युक्तिवादच चूकीचा आहे."[२०] असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले आहे. यावरून महाराष्ट्राला मुंबईचे उत्पन्न अप्रत्यक्षपणे किंवा प्रत्यक्षपणे मिळणारच आहे, असे दिसून येते.

ऐ) मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची गरज

मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करू नये यासाठी बहुभाषिक राज्य हे अधिक चांगले असते कारण त्यामुळे लहान लोकांच्या स्वातंत्र्यास बाधा येत नाही असा युक्तीवाद प्रा. दांतवाला व प्रा. घीवाला यांनी मांडला. हा युक्तीवाद भाषावार प्रांतरचनेच्या मुळावर घाव घालणारा आहे त्यांच्या सर्व युक्तीवादाचा विचार करून डॉ. आंबेडकरानी असे म्हटले आहे की, "त्याच्या मनात एक गोष्ट निश्चितपणे घर करून राहिली असावी, ती म्हणजे त्याना असे वाटत असेल जर मुंबईचा महाराष्ट्रात समावेश केला तर महाराष्ट्र प्रांत हा द्विभाषिक प्रांत होईल. एक मराठी बोलणा-यांचा व दुसरा गुजराथी बोलणा-यांचा आणि मराठी भाषिकांचे वर्चस्व असल्याने ते गुजराथी भाषिकावर कुरघोडी करतील. ही भीती त्याच्या मनात आहे. परंतु अशी परिस्थिती सर्वच ठिकाणी आहे कारण जातिनिहाय संघटीत झालेला समाज ज्या भारतात आहे त्या भारतासारख्या देशात प्रशासकीय कामासाठी त्याचे विभाजन झालेले असले तरी प्रत्येक प्रदेशात एक समाज संख्येने जास्त आहे व तो अन्य समाजावर वर्चस्व गाजविणार हे उघड आहे. ज्या समाजाचे वर्चस्व आहे त्याच्याकडेच राजकीय सत्ता येणार. जर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रात मराठी भाषिक लोकाचे वर्चस्व असल्याने ते गुजराथी भाषिकावर प्रभुत्व गाजविणारच ही वस्तुस्थिती केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित आहे का? गुजरात जर स्वतंत्र प्रांत झाला तर ही परिस्थिती गुजरातमध्ये आढळणार नाही का? मराठी भाषिकामध्ये ही मराठा समाज, गुजराथी व मराठेतर समाजावर वर्चस्व गाजविणारच. त्याचप्रमाणे गुजरातमध्ये अनविल ब्राहमणांचे प्रावल्य आणि काही भागात पातीदाराचे वर्चस्व आहे त्यामूळे अनविल ब्राहमण व पातीदार हे अन्य समाजावर कुरघोडी करणारच. त्यामूळे ही समस्या केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नसून ती सार्वजनिक आहे"[२१] असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले.

त्याचबरोबर प्रांताची पुनर्रचना भाषेच्या आधारावर न करता तर्कसंगतीच्या आधारे करावी आणि राष्ट्रीयत्व हा व्यक्तीगत मुद्दा बनविण्यात यावा, अशी शिफारस प्रा. घीवाला यांनी केले. परंतु या मताशी ही डॉ. आंबेडकर सहमत नव्हते. या विषयी डॉ. आंबेडकर म्हणतात, "तर्कसंगततेच्या आधारे, म्हणजे

अर्थशास्त्राच्या आधारे प्रांताची फेररचना करणे हे भाषावार प्रांतरचनेपेक्षा अधिक शास्त्रशुध्द आहे. परंतु भाषावार प्रांतरचना करण्याने देशाच्या आर्थिक संपत्तीचा तर्कसंगत, व्यवहार्य वापर करण्यात काय अडचण येते हे मला समजले नाही. प्रांताची सीमारेषा या केवळ प्रशासकीय सीमारेषा आहेत, या सीमारेषा आर्थिक संपत्तीचा योग्य वापर करण्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यत्यय निर्माण करीत नाहीत. जर भाषिक प्रांतातील साधन सामग्रीची अवस्था त्याच प्रांतातील लोकांनीच स्पष्ट केली तर भाषावार प्रांतरचनेची योजना खोडसाळ व दिशाभूल करणारी आहे असे म्हणता येणार नाही. परंतू वस्तूस्थिती अशी नाही जोपर्यंत लोकांच्या साधनसामुग्रीच्या होणा-या पिळवणूकीवर वंदी घातली जात नाही, तोपर्यंत भाषावार प्रांतरचनेचे फायदे ख-या अर्थाने मिळू शकणार नाही."[२२] असे सांगून ते पुढे असे म्हणतात की, "राष्ट्रीयत्व ही व्यक्तीगत वाव करून त्याला धर्माप्रमाणे आधार दयायचा ही कल्पना पूर्णपणे अव्यवहार्य आहे, त्यामूळे अनेक प्रशासकीय समस्या निर्माण होतील. जेव्हा संपूर्ण जग हे एकच असेल व सर्व त्याचे नागरीक असतील तेव्हांच असे घडू शकेल. राष्ट्रीयत्व निरूपयोगी ठरून आपोआपच नष्ट होईल."[२३] अशाप्रकारे मुंवई महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची गरज आहे हे डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी स्पष्ट केले आहे.

ओ) मुंबईचा विचार करताना कलकत्ता, मद्रास शहरांप्रमाणेच विचार करावा:

मुंवई महाराष्ट्राचाच भाग आहे. हे अधोरेखित करताना डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी कल्तत्ता व मद्रास शहरांप्रमाणेच त्याचाही विचार करावा असे म्हटले आहे. ते म्हणतात, "महाराष्ट्रातून मुंवई वगळण्याच्या प्रश्नावर निर्णय घेताना आयोगाला कलकत्ता शहराची स्थिती विचारात घ्यावी लागेल. मुंवई प्रमाणेच कलकत्ता शहर हे संपूर्ण पूर्व भारताची व्यापारपेठ आहे. मुंवईतील महाराष्ट्रीयनांप्रमाणे कलकत्यातील वंगाली अल्पसंख्य आहेत. मुंवईतील महाराष्ट्रीयनांप्रमाणे कलकत्यामधील वंगालीची स्थिती अधिक वाईट आहे. मुंवईतील व्यापार व उदयोगाला भांडवल नसले तर कामगार पुरविले असा किमान दावा महाराष्ट्रीयन करू शकतात. परंतू बंगाली लोक असेही म्हणू शकत नाहीत महाराष्ट्रातून मुंवई स्वंतत्र करण्याचा युक्तीवाद जर आयोग स्वीकारू शकत असेल, तर पश्चिम वंगालमधून कलकत्ता स्वतंत्र करण्याची शिफारसही त्याच न्यायाने स्वीकारण्याची तयारी आयोगाने दाखविली पाहिजे. कारण कलकत्ता पश्चिम वंगालमध्ये राहू शकतो, मद्रास तामिळनाडु राज्याशिवाय राहु शकत नाही तर मग मुंबईच महाराष्ट्रात विलीन करण्याबाबत मतभेद का?"[२४] असा प्रश्न उपस्थित करून ते पुढे म्हणतात, "मुंवई स्वतंत्र करण्यापूर्वी मुंवई आर्थिकदृष्टया

स्वयंपूर्ण आहे का ही गोष्ट सिध्द करावी लागेल. मी यापूर्वी म्हंटल्याप्रमाणे मध्याच्या कर आकारणीच्या पध्दतीनूसार मुंबईचे मध्याचे उत्पन्न व खर्च याचा योग्यप्रकारे ताळेबंद काढला तर मुंबई प्रांत स्वंयपूर्ण नाही हे स्पष्ट होईल, जर तसे असेल तर मुंबईचा स्वतंत्र प्रांत करण्याची कल्पना मूळातूनच उखडून निघते."[२५] अशारीतीने मुंबई स्वयंपूर्ण नसून त्याला महाराष्ट्रात समावेश करणे गरजेचे आहे असे मत डॉ. आंबेडकरानी मांडले आहे..

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी असे मत मांडले की, "महाराष्ट्र आणि मुंबई हे केवळ परस्परावलंबी आहेत असे नसून ते खरोखर एक व अविभाज्य आहेत त्यात फाळणी केल्यास दोघांचाही अकाली मृत्यू ठरेल. मुंबईला मिळणा-या वीज व पाण्याचा स्त्रोत महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रातील बुध्दीजीवी वर्ग हा मुंबई त आहे. त्यामुळे महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी केली तर मुंबईचे आर्थिक जीवन धोक्याचे ठरेल व महाराष्ट्रातील समाज नेतृत्वाअभावी भरकटत राहील."[२६] असे सांगून पुढे म्हणतात की,"काही लोकांनी मुंबई चा प्रश्न लवादामार्फत सोपवावा ही सूचना केली आहे. ही सूचना एवढी हास्यास्पद वाव आहे की दुसरी कोणती असणार नाही. मुंबई व महाराष्ट्राची गाठ ही परमेश्वरानेच बांधली आहे. कोणताही लवाद गाठ तोडू शकत नाही किंवा कापू शकत नाही. त्यावर एकच उपाय म्हणजे आयोग."[२७] अशारीतीने महाराष्ट्र व मुंबई हे एकच असून डॉ. आंबेडकरांनी मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करावा याबद्दल केलेल्या युक्तीवादामुळे मुंबई चा महाराष्ट्रात समावेश करावा या महाराष्ट्रीयांच्या मताला दुजोरा देणारे ठरले. मुंबई हे शहर महाराष्ट्र राज्याचा अविभाज्य भाग आहे याचे समर्थन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी भुमिका घेतात की मुंबई या बहुभाषिक राज्यात मराठी भाषिकांची गळचेपी होत आहे.

५. बहुभाषिक मुंबई राज्यात मराठी भाषिकांची गळचेपी

डॉ. आंबेडकराच्या मते मुंबई या बहुभाषिक राज्यात राहून मराठी भाषिकांना कटु अनुभव आले आहेत. ते म्हणतात, "मुंबई विधानसभेत गुजराथी सभासदाचे संख्याबळ १०६ आहे व मराठी सभासदाची संख्या १४९ आहे असे असून देखील मंत्रीपदाची वाटणी सारख्याच प्रमाणात आहे. फक्त उपमंत्र्यामध्ये एक उपमंत्री अधिक असल्यामुळे महाराष्ट्रीयांना एकमताने बहुमत प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर मंत्री आणि उपमंत्री यांच्यात अधिकार व विषयाचे वाटप हे ही पाहणे महत्त्वाचे आहे. कारण मुंबई राज्याच्या संमिश्र

मंत्रिमंडळातील गुजराथी मंत्र्याकडे २०२ विषय आणि मराठी मंत्र्याकडे ८८ विषय होते. याच धर्तीवर उपमंत्र्यामध्ये गुजराथी उपमंत्र्याकडे १५ विषय व महाराष्ट्रीय उपमंत्र्याकडे २१ विषय होते."[२८]

पुढे डॉ. आंबेडकरानी महाराष्ट्र आणि गुजराथ यातील विकास योजनावर किती पैसा खर्च केला गेला याचे तीन वर्षाची आकडेवारी दिली आहे.

विकास योजनावरील दरडोई खर्च

	लोकसंख्या	वर्षे		
		१९५०-५१	१९५१-५२	१९५२-५३
महाराष्ट्र	२,१७,२०,०९१	१.७	२.३	१.८
गुजरात	१,१८,९६,७८९१	२.९	३.१	३.२

वरील आकडेवारीवरून गुजराथी लोकांची लोकसंख्या कमी असताना ही जास्तीत जास्त पैसा त्यांच्यावर खर्च करण्यात आलेला दिसून येतो. ते पुढे असे म्हणतात, "अशाप्रकारची सापत्न भावनेची किती कोणताही सहृदय महाराष्ट्रीय सहन करून घेणार नाही आणि म्हणून यासाठीच सर्वानी वहुभाषिक राज्याची कल्पनाच एकदम झुगारून दिली पाहिजे."[२९] यावरून डॉ. बाबासाहेव आंबेडकरांचा मुंवई वहुभाषिक राज्यातून महाराष्ट्र वेगळे होण्यास पाठींबा होता असे दिसून येते. मुंवई महाराष्ट्राचाच अविभाज्य भाग आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे अधोरेखित केले. मात्र महाराष्ट्र राज्याचे स्वरूप संघीय असावे अशी वेगळी बूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर घेतात.

ब)महाराष्ट्र

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या काळात महाराष्ट्र एकात्म असावा की संघराज्य असावा असा वाद निर्माण झाला होता. महाराष्ट्राचा हा प्रश्न मिटविण्यासाठी चार योजना पुढे मांडल्या गेल्या. त्या पुढील प्रमाणे:

१. चालू स्थितीतील मुंबई राज्य जसे आहे तसेच ठेवणे अर्थात महाराष्ट्र, गुजरात व मुंवई शहर याचे **सद्यस्थितीतील बहुभाषिक राज्य पुढे चालू ठेवणे.**

२. विद्यमान मुंबई राज्यातून महाराष्ट्र व गुजराथ विलग करून त्याचे स्वतंत्र राज्य बनविणे.

३ . मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र बनविणे .

४ . मुंबई महाराष्ट्रातून वेगळी करून तिचे स्वतंत्र नगर राज्य बनविणे .

अशा निरनिराळया योजना मांडल्या गेल्या . महाराष्ट्रातील अनेक नेत्यांची संयुक्त महाराष्ट्र व्हावा हीच अपेक्षा होती, परंतु महाराष्ट्र राज्याची निर्मिती होईल असे दिसत नव्हते . कारण ज्यावेळी राज्य पुनर्रचना समितीचा अहवाल प्रसिध्द झाला . त्यामध्ये विदर्भाला स्वतंत्र राज्य करण्याची शिफारस केल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र बनविणे स्वप्न राहिल काय असे वाटु लागले . या सर्व पार्श्वभूमिवर संयुक्त महाराष्ट्रासंबंधी मोठया प्रमाणात चर्चा होऊ लागली . त्यामध्ये डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्वाचे होते . त्यांनी महाराष्ट्रासंदर्भात सविस्तररीत्या मांडणी केली आणि महाराष्ट्र राज्य कसे असावे, ते स्वयंपूर्ण कसे करता येईल याबद्दल चर्चा केली .

१ . महाराष्ट्र हा स्वयंपूर्ण प्रांत होऊ शकेल काय?

डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी, 'महाराष्ट्र हे भाषिक राज्य' या आपल्या १९४८ साली केलेल्या निवेदनात महाराष्ट्र स्वयंपूर्ण राज्य होईल काय? या प्रश्नाच्या उत्तरादाखल असे म्हटले आहे की, "एखादा प्रांत व्हावयाचा असेल तर हे जाहीर करण्यापूर्वी त्या प्रांताने काही कसोटयांची पूर्तता केली पाहिजे . त्याला काही निश्चित क्षेत्रफळ, निश्चित लोकसंख्या व समतोल महसूल (रेव्हेन्यू) असावयास पाहिजे . असा प्रांत केवळ स्वावलंबी जीवन कंठणारा असून उपयोगाचे नाही, तर समाजकल्याणाच्या गरजांसाठी व कार्यक्षमतेसाठी किमान वर्गाचा कारभार चालविण्याइतके उत्पन्न ही त्याजपाशी असावयास पाहिजे ."[३०]

स्वयंपूर्ण प्रांत होण्यासाठी लोकसंख्या, क्षेत्रफळ व महसूल स्वतंत्र असावयास पाहिजे असे मत डॉ . आंबेडकरांनी मांडले . त्याची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल .

अ) महाराष्ट्राची लोकसंख्या व क्षेत्रफळ –

डॉ . आंबेडकरांनी महाराष्ट्राची लोकसंख्या व क्षेत्रफळाचे स्पष्टीकरण देताना असे म्हटले की, योजलेल्या महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ८४,१५१ चौरस मैल राहील व लोकसंख्या १, ५४,३३,४00 भरेल .

ब) महाराष्ट्राचा महसूल –

सरकारी कराचे सध्या जे प्रमाण आहे ते लक्षात घेता योजलेल्या महाराष्ट्र प्रांताचा एकूण महसूल सुमारे २५, ६१,५१,000 रूपये होईल.

क) अन्य प्रांताशी महाराष्ट्राची तुलना –

महाराष्ट्रासारख्या महसूली उत्पन्न व इतकीच लोकसंख्या असलेले प्रांत व्यवहार्य ठरेल यांची कल्पना येण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेतील काही प्रांतांची महाराष्ट्राशी तुलना केली आहे. अमेरिकेतील पहिल्या किंवा सर्वात मोठया आणि ४७ व्या किंवा सर्वात लहान प्रांताची आकडेवारी दिली आहे. त्यांनी अमेरिकेतील टेक्सास या प्रदेशाचे क्षेत्रफळ २, ६७,३३९ चौरस मैल व डेल्वेअर या राज्याचे क्षेत्रफळ २, 0५७ चौरस मैल आहे. तर न्युयॉर्कची लोकसंख्या १,२६,३२,८९0 तर योनिंग या प्रांताची लोकसंख्या २, ५,१0८ इतकी आहे.[३१]

यावरून महाराष्ट्र हा प्रांत अमेरिकेतील सर्वात लहान प्रांत असलेल्या डेल्वेअरपेक्षा अनेक पटीने प्रदेशाच्या दृष्टीकोनातून मोठा आहे आणि अमेरिकेत सर्वात मोठा प्रांत असलेल्या न्यूयॉर्क पेक्षा लोकसंख्येच्या दृष्टीने अनेक पटीने मोठा आहे. हे स्पष्ट करून महाराष्ट्र राज्य निर्मितीची यथार्थतता स्पष्ट केली आहे.

ड) महाराष्ट्र प्रांत व्यवहार्य –

अमेरिकेतील प्रांताशी महाराष्ट्राची तुलना केली असता भारतातील अस्तित्वात असलेल्या व नियोजित भाषिक प्रांताशी महाराष्ट्राची तुलना करणे उपयुक्त ठरेल असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे. सद्यकालीन (१९४७-४८) परिस्थितीत अस्तित्वात असलेल्या भाषिक प्रांतामध्ये संयुक्त प्रांत, विहार व ओरिसा यांची क्षेत्रफळ ही अनुक्रमे १,0६,२४७ चौ. मै. ६१,७४५ व ३२१९८ चौ. मै. इतकी होती. त्याचबरोबर तेथील लोकसंख्या अनुक्रमे ५,५0,२0६१७ व ३,६३,४0,१५१ आणि ८२,२८,५४४ इतकी होती. वरील आकडेवारीवरून महाराष्ट्राच्या आकडेवारीशी तुलना करून डॉ. आंबेडकर म्हणतात, "महाराष्ट्र केवळ व्यवहार्यच प्रांत ठरेल असे नसून तो प्रदेश लोकसंख्या व महसूल उत्पन्नाच्या दृष्टीने बलशाली प्रांत ठरेल यात मुळीच शंका नाही"[३२]

यावरून महाराष्ट्र हा प्रांत व्यवहार्य आहे, असे स्पष्ट मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले दिसून येते. त्याचबरोबर १९४८ साली महाराष्ट्र एकात्म असावा की संघराज्य असावा असा वाद निर्माण झाला, तेव्हा डॉ. आंबेडकरांनी असे म्हटले की, "महाराष्ट्र हा एकच प्रांत असावा याबद्दल वाद नाही, तर महाराष्ट्र कोणत्या पध्दतीने एक करावा असा वाद होता. याबद्दल दोन मतप्रवाह होते. एक मतप्रवाह असा होता की नवीन महाराष्ट्र प्रांत एकच असावा. त्याचे कायदेमंडळ व प्रशासन एकच असावे. तर दुसरा मतप्रवाह असा होता की महाराष्ट्र प्रांत हे दोन उपप्रांताचे संघराज्य असावे. एका उपप्रांतात मुंबई इलाख्यातील मराठी भाषिक जिल्हयांचा समावेश करावा व दुसऱ्या उपप्रांतात मध्यप्रांत व बेरार या मध्याचा प्रांताचा समावेश करावा. उपप्रांत निर्मितीची कल्पना मध्यप्रांत व बेरार प्रांतातील मराठी भाषिक जिल्हयातील प्रवक्त्यांची आहे."[३३]

अशाप्रकारे दोन मतप्रवाहाचे तपशील सांगून डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात, "एकच भाषा बोलणारा प्रदेश हा एकाच प्रांतात असला पाहिजे याच ठाम मताचा मी आहे. त्याबाबत निवड करण्यास किंवा स्वयंनिर्णयास कोणताही वाव नाही. एकच व्यापक प्रांत तयार करण्यासाठी प्रत्येक प्रयत्न झाला पाहिजे. म्हणून महाराष्ट्राचा सर्व भाग हा एकाच प्रांतात समाविष्ट केला पाहिजे असा माझा आग्रह आहे."[३४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महाराष्ट्राच्या रचनेबाबतची भुमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र प्रांताची व्यवहार्यता स्पष्ट करतात. परंतु पुढे १९५५ साली असे म्हणतात की, "महाराष्ट्रासंबंधी माझी संकल्पना अशी आहे की सद्यस्थितीत मुंबई बहुभाषिक असलेले राज्य सर्वप्रथम बरखास्त करावे, त्यानंतर महाराष्ट्राची विभागीय चार राज्ये बनवावी, ती पुढीलप्रमाणे

अ) महाराष्ट्र नगर राज्य – मुंबई शहर एक उत्कृष्ट व मजबूत नगर राज्य बनविण्याकरीता मुंबई शहर व मुंबई लगतचा प्रदेश यांचे नगर राज्य तयार करता येईल.

ब) पश्चिम महाराष्ट्र – अ) ठाणे ब) कुलाबा क) रत्नागिरी ड) पुणे इ) उत्तर सातारा फ) दक्षिण सातारा ग) कोल्हापूर ह) कर्नाटकात संमिलित मराठी भाषिकाचा मुलूख

क) मध्य महाराष्ट्र – डांग, पूर्व खानदेश, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, परभणी, बीड, उस्मानाबाद, सोलापूर शहर आणि सोलापूर जिल्हयातील मराठी भाषिकांचा प्रदेश आणि तेलंगणाला दिलेला मराठी भाषिकांचा मुलुख.

ड) पूर्व महाराष्ट्र - बुलढाणा, यवतमाळ, अकोला, अमरावती, वर्धा, चांदा (चंद्रपूर), नागपूर, भंडारा आणि हिंदी राज्याना दिलेला मराठी भाषिकांचा मुलूख."[३५]

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला पांठीबा दिला. परंतु परिस्थितीचा विचार करून डॉ. आंबेडकरांनी महाराष्ट्राचे चार राज्ये नर्माण करावीत असे स्पष्ट केले, त्याच्याबद्दल समर्पक चर्चा ही केली.

महाराष्ट्राचे चार विभाग करून मुंबई शहर हे स्वतंत्र असणे गरजेचे होते. कारण जे अल्पसंख्यांक आहेत व ज्या अनुसूचित जाती खेडयात वास्तव्य करीत आहेत त्यांच्यावर नेहमीच अन्याय व जुलूम करण्यात येतो. किंबहुना बहुसंख्यांकडून त्याचे मुडदेही पडतात. यांच्या तावडीतुन निसटण्याकरिता अल्पसंख्यांकाना आश्रयाचे सुरक्षित स्थान पाहिजे. जर संयुक्त महाराष्ट्रामध्ये मुंबईचा समावेश करण्यात आला तर अल्पसंख्यांक अशा कोणत्या सुरक्षित स्थळी आसरा घेऊ शकतील? जेव्हा गोडसेनी गांधींची हत्या केली तेव्हा खेडयापर्यंत पसरलेल्या ब्राम्हण, मारवाडी, गुजराथी इत्यादी अल्पसंख्यांकावर अशाच प्रकारचा अत्याचार करण्यात आला. ते सर्वच शहराकडे पळाले व शहरात वास्तव्य करू लागले. ते आता सुरक्षित स्थळी पोहचले आहेत. अशा जाणीवेने आपले पूर्वानुभव विसरले व खुशाल मुक्त महाराष्ट्राची मागणी करू लागले. अशारीतीने अल्पसंख्यांक समाजाच्या संरक्षणासाठी मुंबई नगरराज्य करणे गरजेचे आहे असे मत डॉ. आंबेडकरानी मांडले.

मुंबई शहराचे नगर राज्य करतेवेळी मुंबई नगरराज्य या नावातून महाराष्ट्र शब्दाचा ध्वनी निघत नाही असा आक्षेप घेण्यात आला त्याबद्दल डॉ. आंबेडकरानी असे म्हटले की, "मुंबई नावातच महाराष्ट्र या शब्दाचे प्रयोजन करून तसे नाव द्यावे अशी सूचना करतात आणि मुंबईचे स्वतंत्र राज्य निर्माण करावे असे म्हणण्यापेक्षा महाराष्ट्राचेच महाराष्ट्र नगर राज्य, पश्चिम महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र व पूर्व महाराष्ट्र असे चार भाग करण्यात यावे. मुंबईचे स्वतंत्र राज्य निर्माण केल्यानंतर त्या गोष्टीला कोणाचाही विरोध राहणार नाही. अशाप्रकारे मुंबईला विलग करून मुंबई हे स्वतंत्र राज्य म्हणून संबोधण्यात येईल. या गोष्टीला कोण विरोध करेल?"[३६] असा प्रश्न करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी महाराष्ट्राचेच चार भाग करावे असे सुचविले.

महाराष्ट्रीय व गुजराथी यांच्या मनातील तणाव निवळण्याकरीता आणखी एक सूचना डॉ. आंबेडकरानी सांगितली आहे ती म्हणजे "मुंबई शहराचे जे अधिक उत्पन्न आहे त्यामध्ये मालमत्ता कर व विद्युत कर यांचा समावेश होतो. मालमत्ता कर हे स्थानिक कर असून ते ज्या राज्यात हा कर जमा होतो त्या राज्याना त्या उत्पन्नाचा वाटा उपभोगता येतो. परंतु विद्युत करावावत तसे नाही. मुंबई शहरात वीजोत्पादन होतच नाही, त्यामुळे विजेवरील कराचे उत्पन्न हक्काने उपभोगता येणार नाही. यासाठी वीज उत्पन्नाचे व मिळकतीचे अलग अलग विभाजन करण्यात यावे आणि मध्यवर्ती सरकारने विद्युत उत्पन्नावरील कर गोळा करावा. मिळकतीचे कराचे चार भाग करून महाराष्ट्रातील चारही भागांना त्यांच्या गरजाप्रमाणे त्यांना वाटून द्यावा"[३७] अशी सूचना डॉ. आंबेडकरानी केली आहे. अशाप्रकारे चार राज्यापैकी मुंबई राज्य निर्माण केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी उर्वरित तीन स्वतंत्र राज्य बनवण्यासाठी काही ऐतिहासिक पुरावे दिले आहेत.

डॉ. आंबेडकरानी फार पुरातन काळापासून महाराष्ट्राची तीन राज्ये अस्तित्वात होती, असे मत मांडले. ते म्हणतात, "सर्वप्रथम अशोक राजाच्या काळीच महाराष्ट्राचा उल्लेख करण्यात आला. अशोकाने 'धर्मप्रचार' मंडळे हिंदुस्थानच्या निरनिराळया भागात बौध्द धर्माचा प्रचार व प्रसार करण्याकरिता पाठविली होती. याचा उल्लेख महावंशात सापडतो. त्यानंतरच्या पाली वाङ्मयात त्रयि महाराष्ट्रिका (तीन महाराष्ट्रे) असे नमूद केल्याचे आढळते. हा शब्द प्रयोगही प्राचीन काळापासून महाराष्ट्राची तीन राज्ये होती हेच दर्शविते."[३८] त्यावरून डॉ. आंबेडकरांचे म्हणणे काही नवीन नाही, ही तीन राज्ये ही नवीन नसून फार पूर्वकाळापासून अस्तित्वात होती असे आढळते. या तिन्ही राज्याची निर्मिती केल्यामुळे भाषिक राज्य रचनेच्या तत्वाला अडथळा निर्माण होत नाही. उलट महाराष्ट्राची तिन्ही राज्ये एका भाषिकांचे असल्यामुळे, भाषिक उन्नती मात्र होईल. महाराष्ट्राच्या तीन विभागापैकी पूर्व महाराष्ट्र हे स्वतंत्र राज्य आहे, सध्याच्या मुंबई राज्यातील मराठी लोकाचे क्षेत्र व हैद्राबाद राज्यातील मराठवाड्याचे क्षेत्र यांची दोन राज्य बनविण्यासाठी विभागणी कशी करावी यावर डॉ. आंबेडकरांनी मराठवाड व मुंबई इलाख्यातील मराठी भाग यानाच दोन वेगवेगळी राज्य म्हणून जावे द्यावी अशी योजना मांडली.

डॉ. आंबेडकरानी महाराष्ट्र हा या चार राज्यात विभक्त असावा याच्या समर्थनात काही मुद्दे स्पष्ट केले आहेत ते पुढीलप्रमाणे:

- संयुक्त महाराष्ट्र या सारख्या अवाढव्य राज्याचे एकच राज्यशासनाकडून शासन करणे शक्य नाही.
- ही तिन्ही राज्ये आर्थिक रचनेच्या दृष्टीने विसंगत आहेत.
- ही तिन्ही राज्ये उद्योगधंद्याच्या वावतीत असामान्य आहेत. पश्चिम महाराष्ट्र व पूर्व महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रात विकास पावलेले आहेत, पण मध्य महाराष्ट्र नाही.
- शैक्षणिकदृष्ट्या ही अलीकडे पूर्व व पश्चिम महाराष्ट्र पुढारलेला आहे, तर दुसरीकडे मध्यमहाराष्ट्र अगदीच मागासलेला आहे त्या ठिकाणी शिक्षणाचे दुर्भिक्षच आहे. डॉ. वावासाहेव आंवेडकर असे म्हणतात की मराठवाडा हा विभाग निजामाच्या ताव्यात असल्यामुळे तेथील विकास झाला नाही. मराठवाड्यातील शैक्षणिक मागासलेपण स्पष्ट करताना असे ते लिहितात, "पुणे विद्यापीठातील शाळा कॉलेजाचा शैक्षणिक दर्जा इतका उंचावला आहे की मराठवाड्याचा एकतरी मुलगा उत्तीर्ण होईल किंवा नाही यांची शंकाच आहे."
- मुंवई विधीमंडळाची एकूण सभासदसंख्या ३१५ आहे. त्यापैकी १४९ सभासद मराठी भाषिक आहेत आणि मुंवई विधान परिषदेची सभासद संख्या ७२ असून त्यापैकी ३४ मराठी भाषिक आहे. परंतू महाराष्ट्राचे मुख्यमंत्री गुजराती भाषीक श्री. मोरारजी देसाई होतात, मग महाराष्ट्रीय नेत्यांवर दडपण आणून गप्प वसवले जाते. त्याच वरोवर मंत्रीमंडळातील खाती वाटप करतानाही मराठी मंत्र्यांच्या वाट्यास खाती कमीच आली आहेत. यावरून मराठी माणसाची किंमत कळून येते.

वरील सर्व विवेचनावरून डॉ. आंवेडकरांनी मराठे राजकारणात कमजोर पडत आहेत असा निष्कर्ष काढला आहे. 'मराठा' शव्दाचा वापर दोन अर्थाने केला जातो. एक म्हणजे सर्व मराठी भाषा वोलणारे ते मराठी आणि ज्या सर्वाची जात मराठा आहे ते मराठे या सर्वांना मिळून मराठे म्हणतात.

परंतु महाराष्ट्राची सत्ता सांभाळणारे जे मराठे आहेत ते मराठी भाषा बोलणारे मराठे नसून ते जातीने मराठे आहेत. मराठे हे सत्ता पिपासू ब्राम्हणाच्या सत्ताभिलाषेला कदापि टक्कर देऊ शकणार नाही. त्यामुळे मराठ्यानी राजकारणाचे धडे घेतलेच पाहिजे. महाराष्ट्राचे एकच राज्य झाले तर एकच मराठा मुख्यमंत्री म्हणून व पाच सहा मंत्री म्हणून सत्ता सांभाळतील आणि तेवढेच लोक राजकारणात तयार होतील. उलट

महाराष्ट्राचे तीन राज्ये झाली तर तीन मराठे मुख्यमंत्री म्हणून तयार होतील व तीस मराठे मंत्री म्हणून राजकारणाचे धडे घेऊ शकतील.[३९] असा सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला.

महाराष्ट्राच्या एकत्रीकरणाच्या दिशेने एक युक्तीवाद पुढे करण्यात येत असे की, रामायणातील रामभरत भेटीप्रमाणे कित्येक वर्षाच्या ताटातुटीनंतर मराठ्याची संयुक्त महाराष्ट्रात पुर्नभेट होत आहे. याला उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणतात, "हा युक्तीवाद बेअकली व कोत्या विचाराचा आहे. काही राजकारणी संधी साधू महाराष्ट्रीय राजकीय स्वरूपाचे करार मदार करण्यात समाधान मानत आहेत. परंतु असे करार घडविण्यापेक्षा ज्यांचा कारभार त्यानीच चालविण्याकरिता त्याच्या हातात सत्ता देणे अधिक चांगले नाही का?"[४०] असा प्रश्न उपस्थित करून ते पुढे असे म्हणतात की, "मध्य महाराष्ट्रीय जनतेला मी असे सांगू इच्छितो की त्यांनी स्वंतत्र राज्याची मागणी करावी, जेणेकरून त्याचे नष्टचर्य संपुष्टात आणण्याकरिता त्याच्या हाती सत्ता राहू शकेल."[४१] अशारीतीने मराठवाडा स्वतंत्र व्हावा अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.

अशारीतीने डॉ. आंबेडकरांनी मुंबई महाराष्ट्राचे एक भाग असून, तो महाराष्ट्रास मिळावा व संयुक्त महाराष्ट्र निर्माण न करता त्याचे चार भाग करावे असे सूचविले. त्याचबरोबर १ मे १९५६ रोजी राज्यसभेमध्ये भाषण करताना त्यांनी देशाच्या ऐक्यासाठी उत्तरप्रदेशची तीन बिहारची तीन, मध्यप्रदेशाची दोन व महाराष्ट्राची तीन राज्ये करण्याची सूचना केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या भुमिकेवर वृत्तपत्रातून टीकेची झोड उठली तशी वैयक्तिक खाजगी पत्रेही त्यांना गेली या सर्व टीका लक्षात घेऊन डॉ. आंबेडकरानी आपली भूमिका स्पष्ट करणारा लेख २ जुन १९५६ च्या जनतामध्ये लिहिले. त्यात डॉ. आंबेडकरानी असे म्हटले की, "राज्यसभेमध्ये मुंबईबावत मी ज्या सूचना केल्या आहेत त्या महाराष्ट्रीयांना पूर्णत: समाधानकारक वाटत नाहीत. महाराष्ट्रीयांना अशी भिती वाटते की मुंबईचे शहरराज्य झाल्यास त्यांना पुरेसे बहुमत मिळणार नाही. गुजराथी लोकसंख्या १५ टक्के असल्यामुळे मुंबईच्या विधिमंडळात १00 जागा असतील तर गुजराथ्यांना दोन किंवा चार जागा मिळतील त्यापेक्षा अधिक मिळणे शक्य नाही. यामुळे दोन्ही जमाती एकमेकाविरूद्ध जळफळत रहातील, पण त्यांना काही करता येणार नाही. ही अर्थातच काही मोठी समाधानकारक स्थिती नाही. आपल्याला जरी सद्भावना निर्माण करता आल्या नाहीत तरी शांतता हवी आहे.

म्हणून राज्यसभेत मी केलेल्या सूचनेऐवजी निराळी एक सूचना करू इच्छितो. माझी अशी सूचना आहे की, महाराष्ट्राची दोन राज्ये करावीत. एक राज्य पुढील जिल्ह्याचे करण्यात यावे १) वृहन्मुंबई २) ठाणे जिल्हा ३) कुलावा ४) रत्नागिरी जिल्हा ५)कोल्हापूर जिल्हा ६) सूरत, कारवार, बेळगाव या जिल्ह्यातील मराठी भाषिक भाग. सह्याद्रीची पर्वतश्रेणी ही या दोन राज्यांना छेदून जाणारी रेषा आहे. यामुळे पुढील फायदे होतील. १) मुंबईत महाराष्ट्रीयांना निर्णायक बहुमत नसले तरी मुंबई राज्यात बहुमत मिळेल. २) तो एक स्वतंत्र सांस्कृतिक घटक होईल. ३)तो स्वतंत्र भाषिक घटक होईल. ४) या घटकाचे क्षेत्रफळ १९,९00 चौ. मैल व लोकसंख्या ९0,६७,४१३ असेल. एक राज्य होण्यास या गोष्टी अनूकुल आहेत. मुंबई राज्य समुद्रतीराला लागून असे राहील. या राज्याची लोकसंख्या बुद्धीमान आहे. महाराष्ट्राचे बहुतेक पुढारी या भागातून येतात. लोक दर्यावर्दी आणि शूर आहेत. याखेरीज आणखी एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. विशेषत: भारत सरकारने तो केला पाहिजे. मुंबई हा आरमाराचा तळ आहे आणि लोक नाराज व असंतुष्ट असतील तर आरमार कार्य यशस्वीरीत्या होणार नाही. जर लाक असंतुष्ट असतील तर त्याचे परिणाम फार गंभीर स्वरूपाचे होतील. म्हणून भारत सरकारने मुंबई महाराष्ट्राला देऊन त्याची सद्भावना मिळविली पाहिजे.

मी वर सचिविल्याप्रमाणे महाराष्ट्राची दोन राज्ये करण्यास महाराष्ट्रीयांचा काही आक्षेप असेल, असे मला वाटत नाही. देश व कोकण वा अपरान्त असा प्रकारची महाराष्ट्राची विभागणी फार पूर्वीपासून झाली आहे. आता पश्चिम व पूर्व महाराष्ट्र असे म्हणावे. उरलेला महाराष्ट्र हा पश्चिम महाराष्ट्र म्हणून संबोधावा. ते राज्यही खुप मोठे होईल."[४२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या लेखानंतरच्या काळात संयुक्त महराष्ट्राची चळवळ अधिक विस्तारू लागली. त्यामुळे सर्वजण एकत्र येण्याची गरज होती. त्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नत्यांनी डॉ. आंबेडकरांची भेट घेऊन प्रदीर्घ चर्चा केली व एक स्थूल कार्यक्रम संमत केला. त्यानुसार समितीच्या सर्व शाखांतून शेडयूल कास्ट फेडरेशनचे प्रतिनिधी घेतले जातील व ते समितीत घटक पक्ष म्हणून सामील होतील असे ठरले. दुर्दैवाने ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकराचा माहापरीनिर्वाण झाला. त्यानंतर शेकाफेने संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पाठींबा दिला, त्यांच्या बरोबर निवडणूक लढविली. यावरून हे स्पष्ट होते की, अतिमत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेस अनुकूल होते.

संदर्भ सूची :

१ डॉ.वी.आर.आंबेडकरांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.१३ व १४

२ कित्ता, पृ.१५

३ कांबळे, बी.सी., मराठी भाषिकांचा महाराष्ट्र, भारत भूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९४८, पृ.२० व २१.

४ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches ,Vol. No.I, Govt.of Maharastra, 1989, P.113

५ डॉ. बी.आर.आंबेडकरांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.१६ व १७

६ जाधव वि.तु.(अनु.) भाषिक राज्यपुनर्रचना मीमांसा, बुध्दभूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९५५, पृ.२४

७ दहिवले स्मरण(अनु.) भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ.३७

८ कित्ता, पृ.३७

९ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.156

१० डॉ. बी.आर.आंबेडकरांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८, पृ. १७

११ कित्ता, पृ.१७

१२ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.157

१३ कांबळे, बी.सी., मराठी भाषिकांचा महाराष्ट्र, भारत भूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९४८, पृ.२८ व २९.

१४ डॉ. बी.आर.आंबेडकरांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८, पृ. २१ व २२

१५ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.119

16 किल्ला, पृ.१२०

१७ दहिवले स्मरण (अनु.), भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ.३८

१८ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.120

१९ डॉ.वी.आर.आंबेडकरांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.२३ व २४

२० किल्ला, पृ.२४

२१ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.123

२२ डॉ.वी.आर.आंबेडकरांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.२८

२३ किल्ला, पृ.२८ व २९

२४ कांबळे, बी.सी., मराठी भाषिकांचा महाराष्ट्र, भारत भूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९४८, पृ.४०

२५ किल्ला, पृ.४०

२६ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol.No.I Govt.of Maharastra 1989 pp.127

27 किल्ला, पृ.१२७

२८ किल्ला,पृ.१५४

२९ दहिवले स्मरण (अनु.), भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ.३५

३० कांबळे, बी.सी., मराठी भाषिकांचा महाराष्ट्र, भारत भूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९४८, पृ.१०

३१ किल्ला, पृ.१२

३२ Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.109

३३ डॉ.वी.आर.आंबेडकरांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.१२

३४ किल्ला, पृ.१२

३५ दहिवले स्मरण (अनु.), भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ.३२

३६ किल्ला, पृ.४0

३७ किल्ला, पृ.४0 ते ४१

३८ जाधव वि.तु.(अनु.), भाषिक राज्यपुनर्रचना मीमांसा, वुध्दभूषण प्रिटींग प्रेस, मुंबई, १९५५, पृ.२८

३९ किल्ला, पृ.३१

४0 दहिवले स्मरण (अनु.), भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८,पृ.४६ ते ४७

४१ किल्ला, पृ.४७

४२ लेख, जनता, २ जुन १९५६